




संगमनेर । अकोले । कोपरगाव । राहाता । श्रीरामपूर । राहुरी । नेवासा । शेवगाव येथून एकाच वेळी प्रसिध्द..

बांधिलकी जनहिताची

# नायक

सायं.दैनिक

संपादक : गोरक्षनाथ मदने | कार्यकारी संपादक : श्याम तिवारी








Sangamner ▮ MAHMAR/2018/75654 ▮ SRP/135/2022-2024 ▮ वर्ष ८ ▮ अंक ७ ▮ ४/५/२०२५ (दैनिक) ▮ किंमत रु.२/- ▮ पाने ४










# माजीमंत्री बाळासाहेब थोरात कॉँग्रेसच्या कोट्यातून राज्यसभेवर?

## कारखान्याच्या चेअरमनपदाबाबत उत्सुकता

## ज्येष्ठनेते पांडूरंग घुलेंच्या नावाची चर्चा

**नायक वृत्तसेवा, संगमनेर**

विधानसभा निवडणुकीत संगमनेरात महायुतीला पहिल्यांदाच यश मिळाले. त्यामुळे यंदाच्या कारखाना निवडणुकीतही त्याचे प्रतिबिंब उमटतील असाच सर्वांचा कयास होता. मात्र विविध नाट्यमय घडामोडींनंतर विरोधकांनी ऐनवेळी माघार घेतल्याने यंदाही कारखान्याचे संचालक मंडळ बिनविरोध झाले. माजीमंत्री बाळासाहेब थोरात यांनी यावेळच्या कारखाना निवडणुकीत भाकरी फिरवल्याने त्यातून सत्ताधारी गटात काहीशी नाराजीही निर्माण झाली. यासर्व पार्श्वभूमीवर आता सभासदांमध्ये चेअरमनपदाची उत्सुकता ताणलेली असतानाच माजीमंत्री बाळासाहेब थोरात कॉँग्रेसच्या कोट्यातून राज्यसभेवर जाणार असल्याच्या चर्चा रंगल्या आहेत.







असे घडल्यास त्यांच्याकडून चेअरमनपद नाकारले जाण्याची शक्यता असल्याने कारखान्याचा नवा चेअरमन कोण? असा प्रश्न निर्माण झाला आहे. यावेळी संचालक मंडळावर दृष्टीक्षेप टाकल्यास इंद्रजीत थोरात यांच्या नावाचा पुसटसा उल्लेख सुरु आहे, मात्र बदललेल्या राजकीय परिस्थितीत त्यांच्या नावावर एकमत होण्याची शक्यता खूप कमी आहे. अशास्थितीत विद्यमान आमदारांच्या गटातील पांडूरंग घुले या एकमेव ज्येष्ठ सदस्यावर विश्वास टाकला जावू शकतो. मात्र याबाबत कोणीही ठामपणे सांगायला तयार नसून (पान ३ वर)

■ विधानसभा निवडणुकीतील पराभवानंतर सहकार पातळीवर बदल करताना माजीमंत्री बाळासाहेब थोरात यांनी त्याच त्या चेहऱ्यांना नारळ देवून नव्यांना संधी दिली. त्यामुळे यावेळी कारखान्याचे चेअरमनपदही त्यांच्या कडेच राहील असे चित्र निर्माण झाले होते. मात्र आता काँग्रेसने त्यांचे राजकीय पुनर्वसन करण्यासाठी त्यांना राज्यसभेवर पाठवण्याची तयारी केल्याची चर्चा असल्याने अशास्थितीत कारखान्याचे चेअरमन कोण होणार याबाबतची उत्सुकताही ताणली जात आहे. त्यातून वेगवेगळी नावे समोर येत असून दहा वर्ष बाजार कमिटीचे यशस्वी चेअरमन राहीलेल्या पांडूरंग घुले यांचे नाव आघाडीवर आहे.

### महत्त्वाचे

### जिल्ह्याच्या काही भागात आज पासून पाऊस

अहिल्यानगर : जिल्ह्याच्या काही भागात आज शनिवार दि.३ ते मंगळवार दि. ६ मे दरम्यान वादळी वारा, विजेचा कडकडाट आणि हलक्या ते मध्यम स्वरूपाचा पाऊस होण्याची शक्यता हवामान खात्याने व्यक्त केली आहे. यामुळे नागरिकांना सतर्क राहण्याचा आणि आपली सुरक्षा निश्चित करण्याचे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे. हवामान खात्याच्या माध्यमातून यलो अलर्ट जारी करण्यात आलेला आहे. प्रशासनाने या स्थितीवर नियंत्रण ठेवण्यासाठी नागरिकांमध्ये जागरूकता निर्माण करण्याचा प्रयत्न केला आहे.

## सततच्या त्रासाला कंटाळून विवाहितेची आत्महत्या!

**नायक वृत्तसेवा, अहिल्यानगर**

सासरी नांदत असताना सातत्याने होत असलेला शारीरिक व मानसिक छळ असह्य झाल्याने विवाहित तरुणीने आत्महत्येचा पर्याय निवडत आपले जीवन संपविल्याची दुर्दैवी घटना शनिवारी नगर तालुक्यातील देहरे येथे घडली.

देहरे येथील पूनम विशाल लांडगे (वय २८) या विवाहितेने शनिवारी सकाळी १० वाजेच्या सुमारास राहत्या घरी विषारी औषध प्राशन करत आत्महत्या केली आहे. पूनम हिचा विवाह ३ वर्षांपूर्वी देहरे येथील विशाल रावसाहेब लांडगे या लष्करी जवानासोबत झाला होता. तिला



एक दीड वर्षाची लहान मुलगी आहे. तिच्या आत्महत्येनंतर तिचे वडील गोविंद गंगाधर पठारे (वय ५३, रा. देवळाली प्रवरा, ता. राहुरी) यांनी एमआयडीसी पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे.या फिर्यादीवरून मृत पूनम हिचा नवरा विशाल रावसाहेब लांडगे, सासू सुंदरबाई रावसाहेब लांडगे, (पान ३ वर)

## तेरा वर्षीय चिमुकलीचा काविळीने मृत्यू!

### आरोग्य विभाग, ग्रामपंचायत व प्राधिकरण जबाबदार : पिचड

**नायक वृत्तसेवा, राजूर**

गत आठवड्यात अकोले तालुक्यातील राजुर येथे कावीळ या आजारामुळे प्रियंका हरिभाऊ शेंडे या २० वर्षीय तरुणीच्या मृत्यू झाला होता. काल रात्री पुन्हा मिजबाह इलिया शेख या १३ वर्षीय चिमुकलीचा काविळीने मृत्यू झाल्याने ग्रामस्थातून मोठ्या प्रमाणात संताप व्यक्त होत आहे. या गोष्टीला आरोग्य विभाग, ग्रामपंचायत आणि प्राधिकरण जबाबदार असल्याचा आरोप माजी आमदार वैभव पिचड यांनी केला असून त्यांनी मृतांच्या घरी भेट देऊन सांत्वन केले.

यावेळी बोलतांना माजी आमदार वैभव पिचड यांनी या दुर्दैवी मृत्यूसाठी ग्रामपंचायत, आरोग्य विभाग तसेच जीवन प्राधिकरण यांना जबाबदार धरले. गावात स्वच्छ (पान ३ वर)

















सुविचार : तुमच्या आयुष्यातून सूर्य निघून गेला म्हणून तुम्ही रडत असाल, तर अश्रुंमुळे तुम्हाला तारेही पाहता येणार नाहीत. – रविंद्रनाथ टागोर

## पाकिस्तान एकाकी

पहलगाममधील दहशतवादी हल्ल्यानंतर भारत–पाकिस्तानमध्ये युद्ध पेटण्याची शक्यता वाढली आहे. पहलगाममधील अतिरेकी हल्ल्यामागे पाकिस्तानचा थेट हात होता हे भारताने जगाला पटवून दिले आहे. त्यासाठी आवश्यक असलेले गुप्तचर पुरावेसुद्धा सादर केले आहेत त्यामुळे भारताला जगभरातून पाठिंबा मिळत आहे. पंतप्रधान मोदींनी १६ देशांच्या प्रमुखांशी थेट संवाद साधला आहे. सर्व नेत्यांनी या हल्ल्याचा कठोर शब्दांत निषेध केला असून भारताला पाठिंबा दिला आहे. भारत–पाकिस्तान सीमेवर तणावाची परिस्थिती आहे. सौदी अरेबियानेसुद्धा भारत–पाकमध्ये वाढत असलेल्या तणावावर चिंता व्यक्त केली आहे. सौदीच्या परराष्ट्रमंत्र्यांनी पाकिस्तान आणि भारताच्या परराष्ट्रमंत्र्यांना फोन करून परिस्थितीची माहिती घेतली. अमेरिकेनेदेखील भारत–पाकमधील तणावपूर्ण परिस्थितीवर चिंता व्यक्त केली आहे. भारत–पाक हे दोन्ही देश आमच्यासाठी जवळचे आहेत. दोन्ही देशात कायमचा तणाव राहिला आहे मात्र ते त्यावर तोडगा काढतील, असा आम्हाला विश्वास वाटतो. पाकिस्तान उसने अवसान आणून युद्धाच्या पोकळ धमक्या देत असला तरी प्रत्यक्ष युद्ध पेटलेच तर भारतापुढे त्यांचा क्षणभरही टिकाव लागणार नाही. पाकमध्ये अंतर्गत बंडाळी माजली आहे. स्वतंत्र बलुचिस्तानच्या मागणीसाठी बलूच बंडखोर पाक सैन्यावर सतत हल्ले चढवत आहेत. कधी रेल्वे हायजॅक तर कधी पाकिस्तानी लष्कराच्या ताफ्यावर हल्ले अशा पद्धतीने बलूच लिबरेशन आर्मी सातत्याने पाकिस्तानी सैन्याला लक्ष्य करीत आहे. पाकव्याप्त काश्मीरमध्येसुद्धा असंतोष उफाळून आला आहे. हजारो नागरिक पाकिस्तान सरकार विरोधात रस्त्यावर उतरले आहेत. पाकिस्तान सरकार विरोधात जोरदार घोषणाबाजी केली जात आहे. भारताने पाकव्याप्त काश्मीर ताब्यात घ्यावा या मागणीने जोर धरला आहे. आधीच पाकिस्तानचे दोन तुकडे झाले आहेत. आता तिसरा तुकडा पाडल्याशिवाय त्यांची गुर्मी उतरणार नाही, असे मत भारतातील संरक्षण तज्ज्ञ व्यक्त करीत आहेत. यामुळे भारताने कोणत्याही प्रकारची कारवाई करून बळकावलेला काश्मीर ताब्यात घ्यावा, अशी मागणी देशभरातून केली जात आहे. दहशतवादी



हल्ल्यानंतर लष्कराच्या तिन्ही दलांकडून युद्ध सराव सुरू आहे. सीमेवर पाककडून वारंवार शस्त्रसंधीचे उल्लंघन केले जात आहे. त्याला चोख प्रत्युत्तर दिले जात आहे. आतापर्यंत ९ दहशतवाद्यांची घरे उडवून देण्यात आली आहेत. साडेचारशेच्या आसपास संशयित ताब्यात घेण्यात आले आहेत. गत दोन दशकांमधील हे सर्वांत मोठे कोम्बिंग ऑपरेशन आहे. दहशतवाद्यांना पोसणाऱ्या पाकच्या पापाचा घडा आता भरला आहे. दहशतवादी कारवायांना बळ देत त्यांनी भारताविरुद्ध छुपे युद्ध सुरू ठेवले होते. आता पाकला धडा शिकवावा, अशी असंख्य भारतीयांची मागणी आहे. भारत आपल्यावर कधीही हल्ला करू शकतो, असे पाकिस्तानी लोकांनाही वाटते म्हणून ते काळजीत पडले आहेत. पाकिस्तानी प्रशासनही हादरून गेले आहे म्हणूनच की काय पाकिस्तानी लष्करामध्येही हालचाली वाढल्या आहेत. पाकिस्तानी लष्करातील सुमारे ५ हजार जवानांनी आपल्या नोकरीवर पाणी सोडले आहे. पेशावर स्थित पाक लष्कराच्या ११ व्या कोअरचे कमांडर ले. जन. उमर बुखारी यांनी पाक लष्करप्रमुख असीम मुनीर यांना पत्र पाठवले असून त्यांना या राजीनाम्यांची माहिती देण्यात आली आहे. हे राजीनामा सत्र थांबवण्यात यावे कारण या कृतीमुळे लष्करात वेगळा संदेश जात असून त्यामुळे इतर सैनिकांचे खच्चीकरण होऊ शकते, असेही पत्रात म्हटले आहे. पाकचे पंतप्रधान शाहबाज शरीफ यांचे मोठे बंधू माजी पंतप्रधान नवाज शरीफ यांनी भारताशी पंगा न घेण्याचा सल्ला दिल्याचे सांगण्यात येते. नवाज शरीफ यांनी भारतासोबतचे ताणलेले संबंध सुधारण्यासाठी शाहबाज शरीफ यांना राजनैतिक पातळीवर हा प्रश्न सोडवण्याचा सल्ला दिला आहे. भारतासोबत युद्ध होणे पाकच्या दृष्टीने हिताचे नाही, असे त्यांनी म्हटले आहे. युद्धाची शक्यता लक्षात घेऊन पाकिस्तानातील अनेक लष्करी अधिकाऱ्यांनी आणि नेत्यांनी आपल्या कुटुंबीयांना सुरक्षित स्थळी हलवले आहे. भारत आणि पाकिस्तानमधील वाढत्या तणावाच्या पार्श्वभूमीवर संयुक्त राष्ट्राने दोन्ही देशांना संयम बाळगण्याचा सल्ला दिला आहे. संयुक्त राष्ट्राने २४ एप्रिलला पत्रकार परिषद घेऊन पहलगाममधील कट्टरतावादी हल्ल्याचा निषेध केला तसेच दोन्ही देशांनी जास्तीत जास्त संयम बाळगावा आणि दोन्ही देशांमधील परिस्थिती आणखी बिघडू नये याची काळजी घ्यावी, असे म्हटले आहे. पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर प्रत्येक भारतीयाची ही भावना आहे की, पाकिस्तानच्या विरोधात जोरदार कारवाई केली जावी. पाकिस्तान दहशतवाद्यांना कसं पोसतो, ट्रेनिंग देतो ते साऱ्या जगाला माहित आहे. दहशतवाद्यांना तयार करण्याचा हा पाकिस्तानी पॅटर्न आहे. तरुणांची माथी भडकावली जातात, त्यांना चिथावणी दिली जाते आणि मग हातात हत्यार देऊन त्यांना ट्रेनिंग दिलं जातं. एवढं सारं करूनही पाकिस्तान जबाबदारी झटकतो; परंतु परदेशातील एजन्सीकडून सत्य समोर येतच!

> भारतीय मनोरंजन उद्योग आज एका नव्या वळणावर उभा आहे. त्याला अनंत आकाशात झेप घेण्यासाठी पंखात बळ हवे आहे. देशातील तरुणांच्या आशा आकांक्षा पल्लवित करण्याचे आणि त्यांना रोजगाराची नवी क्षेत्रे मिळवून देण्याचे सामर्थ्य या उद्योगात असल्यामुळे त्याचा संख्यात्मक आणि गुणात्मक विकास करणे अत्यंत आवश्यक आहे. त्यासाठी संरचनात्मक व्यवस्था सुद्धा विकसित करावी लागणार आहे. अशी व्यवस्था विकसित करण्याच्या दृष्टीने इंडियन इन्स्टिटयूट ऑफ क्रिएटिव्ह टेक्नॉलॉजी म्हणजे भारतीय कल्पक तंत्रज्ञान संस्था ही आता नव्याने उदयास येत आहे आणि या संस्थेचे केंद्रस्थान मुंबईमध्ये असणार आहे.



## वेव्ह परिषदः माहिती व मनोरंजन उद्योगातील सॉफ्ट शक्तीचा अभ्युदय

■ प्रा. डॉ. वि. ल. धारूरकर

मार्शल मॅक्लुहान या माध्यम तज्ञाने संज्ञापन क्रांतीमुळे सारे जग एक सुंदर खेडे होईल असे वर्णन केले होते. त्याच्या सिद्धांताचा प्रत्यय २१ व्या शतकात झपाट्याने येत आहे. विशेषतः नवी माध्यमे ही मानवाच्या ज्ञानेंद्रियाचा विस्तार करीत आहेत. नभोवाणी हा कानाचा विस्तार, चित्रवाणी हा डोळ्याचा विस्तार, संगणक हा मानवी मज्जासंस्थेचा विस्तार करीत आहे. विशेषतः माध्यम आणि मनोरंजन क्षेत्र मिळून सबंध जगामध्ये भारताचे जे प्रभुत्व निर्माण झाले आहे ते अनन्य साधारण श्रेष्ठ उंचीचे आहे. भारताच्या राष्ट्रीय विकास वेगाच्या तिप्पट माहिती व मनोरंजन उद्योगाचा वेग आहे. त्यामुळे भारत माध्यम आणि मनोरंजन क्षेत्राची राजधानी म्हणून उदयास येत आहे. शिवाय या क्षेत्रातील सॉफ्ट पॉवर म्हणून भारताचे स्थान जगात पहिल्या क्रमांकाचे आहे. जगामध्ये सर्वाधिक चित्रपट निर्माण करणारा देश कोण असेल तर तो भारत आहे. भारतातील ३५ भाषांमध्ये कंटेन्ट किंवा आशय चित्रपटाच्या माध्यमातून निर्माण केला जात आहे. स्टोरी टेलींग किंवा कथाकथनाच्या बाबतीत जगामध्ये भारताचा क्रमांक पहिला आहे. १०,००० वर्षांपासून भारतीय आपल्या कथा आणि व्यथा माध्यमांच्याद्वारे साऱ्या जगाला सांगत आहे. त्यातच भारताच्या मनोरंजन उद्योगाचे मर्म दडलेले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या दूरदृष्टीमुळे वेव्ह शिखर परिषद मुंबईत १ ते ४ मे दरम्यान पार पडली. या परिषदेचे खरे उद्दिष्ट मनोरंजन क्षेत्रातील नवनव्या रोजगार क्षमतांचा शोध घेऊन तरुणांना त्यासाठी तयार करणे हा आहे, सज्ज करणे हा आहे. माहिती व मनोरंजन उद्योगाच्या दृष्टीने ही परिषद म्हणजे एक जागतिक कुंभमेळाच ठरणार आहे. शिवाय माहिती व मनोरंजन उद्योगा पुढील समस्यांचा, संधींचा आणि आव्हानांचा सुद्धा त्यामध्ये विचार होत आहे. या परिषदेचे मंथनतत्त्व आणि त्यातील दृढतर सिद्धांतांची मांडणी करण्यासाठी प्रस्तुत लेखाची योजना केली आहे.

**मुंबई हे केंद्रस्थानः**

१९११ साली मूळ नाशिकचे असलेले आणि अस्सल मराठी बाणा लाभलेले दादासाहेब फाळके यांनी पहिला चित्रपट निर्माण केला. तेव्हापासून भारतीय सृजनशील निर्मात्यांनी मागे वळून पाहिलेच नाही. आज भारताचा चित्रपट उद्योगातील झपाटा एवढा मोठा आहे की, भले भले देश मागे पडले आहेत आणि मनोरंजन उद्योगातील कलात्मकता, सृजनशीलता, उद्यमशीलता आणि नव्या क्षितिजांचा शोध घेण्याची जबरदस्त महत्त्वाकांक्षा यामुळे माहिती व मनोरंजन क्षेत्रात भारत अग्रभागी आहे. ही परिषद देशाच्या अन्य महानगरांपेक्षा मुंबईत का होत आहे? त्याची तीन कारणे आहेत. पहिले म्हणजे येथील बॉलीवूड चित्रपट उद्योगातील कल्पक आणि कलात्मक क्षमतांची गरुडझेप. दुसरे म्हणजे भारताची आर्थिक राजधानी या नात्याने या उद्योगाला गगनात भरारी घेण्यासाठी पंख देण्याचे सामर्थ्य आणि तिसरे म्हणजे नव्या जगात चित्रपट आणि पूरक उद्योगांना नव्या संधी उपलब्ध करून देण्याची क्षमता केवळ या माध्यमात आहे. हे लक्षात घेऊन मुंबईची निवड करण्यात आली आहे. त्यामागे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची दूरदृष्टी आहे. दावोस येथे व्यापार परिषद दरवर्षी होते. कान्स येथे चित्रपट महोत्सव होतो. त्याच पद्धतीने मुंबईमध्ये आता ही वेव्ह परिषदेची जी मुहूर्तमेढ रोवण्यात आली आहे ती भविष्यकाळामध्ये वैश्विक कुंभमेळ्याची एक सक्षम बैठक म्हणून उदयास येत आहे.

भारतीय मनोरंजन उद्योग आज एका नव्या वळणावर उभा आहे. त्याला अनंत आकाशात झेप घेण्यासाठी पंखात बळ हवे आहे. देशातील तरुणांच्या आशा आकांक्षा पल्लवित करण्याचे आणि त्यांना रोजगाराची नवी क्षेत्रे मिळवून देण्याचे सामर्थ्य या उद्योगात असल्यामुळे त्याचा संख्यात्मक आणि गुणात्मक विकास करणे अत्यंत आवश्यक आहे. त्यासाठी संरचनात्मक व्यवस्था सुद्धा विकसित करावी लागणार आहे. अशी व्यवस्था विकसित करण्याच्या दृष्टीने इंडियन इन्स्टिटयूट ऑफ क्रिएटिव्ह टेक्नॉलॉजी म्हणजे भारतीय कल्पक तंत्रज्ञान संस्था ही आता नव्याने उदयास येत आहे आणि या संस्थेचे केंद्रस्थान सुद्धा मुंबईमध्ये असणार आहे. अशा प्रकारची अभिनव कल्पना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी त्यांच्या अपूर्व प्रतिभाशक्तीतून विकसित केली आहे. कारण नव्या जगात कल्पकता ही तंत्रज्ञानाच्या सहाय्याने अधिक सक्षम आणि तेवढीच तेजःपुंज बनू शकते. या दृष्टीने कल्पकतेला तंत्रज्ञानाची जोड देण्याची योजना या संस्थेमार्फत करण्यात येईल आणि ही संस्था वैश्विक स्तरावर श्रेष्ठ गुणवत्तेचे शिखर बनेल असा प्रयत्न केला जाणार आहे.

**महत्त्वाचे बिंदूः**

एकीकडे माध्यम क्षेत्राचे परिदृश्य बदलत आहे आणि दुसरीकडे ही परिषद नव्या आकांक्षा घेऊन येत आहे. ही परिषद पाच प्रमुख बिंदूंना स्पर्श करेल. मूलतः ही परिषद म्हणजे एक टर्निंग पॉईंट वळण देणारी घटना ठरणार आहे आणि ती माध्यम क्षेत्रातील सुवर्णयुगाची

● नोंद

पहाट होय. वेव्ह असे व्यासपीठ ठरणार आहे की, ज्यामुळे भारतीय मनोरंजन उद्योगातील एक नवे पान लिहिले जाणार आहे. भारतीय मनोरंजन उद्योग खऱ्या अर्थाने जागतिक बनण्याच्या दृष्टीने या परिषदेला नव्या स्वप्नांची जोड सत्यामध्ये उतरविण्यासाठी दिली जात आहे. हा खऱ्या अर्थाने एक नवा मैलाचा दगड ठरू शकेल. या परिषदेतील विचार मंथनातून नवे रत्न बाहेर पडेल. यातील प्रमुख पाच बिंदूंपैकी पहिला कोणता असेल तर तो मनोरंजन उद्योगातील क्षमता आणि सामर्थ्याचा शोध घेणे. मनोरंजन उद्योगातील वैविध्य, कल्पकता आणि क्षमतांचा शोध. तसेच नवोन्मेषशाली, प्रतिभाशाली संशोधकांचा आणि सृजनशील विद्वानांचा समूह मनोरंजन उद्योगाला मार्गदर्शन करेल तेव्हा सबंध चित्र बदलले असेल. सर्जनशील आणि कलात्मक क्रांतीचा एक नवा टप्पा भारताने गाठला आहे आणि भारत या परिषदेच्या रुपाने जागतिक मनोरंजन उद्योगाचे नेतृत्व करण्यासाठी सज्ज झाला आहे. त्यापुढील आव्हानांचा विचार करता असे दिसते की, जगात तंत्रज्ञान विपुल आहे. परंतु कलात्मक प्रतिभाशक्तीची वानवा आहे आणि अशी प्रतिभाशक्ती केवळ भारतीय कलावंतांच्या क्षमतेमध्ये दिसून येते. त्यामुळे भारतात मनोरंजन उद्योग नवी उंची गाठत आहे. कालिदासाचे शाकुंतल असो, मालविकाग्नी मित्र असो की, मेघदूत असो अशा सर्व संस्कृत साहित्यातील अभिजात कलाकृती, चित्रपट, छोटा पडदा आणि अन्य माध्यमातून जेव्हा येतील तेव्हा जगातील संपत्तीचा ओघ भारताकडे वळेल ही एका नव्या सुवर्णयुगाची नांदी ठरू शकते. नवे प्रयोग, नव्या कल्पकता आणि नव्या रोजगार क्षमता यांचा शोध घेत ही परिषद नवी उंची गाठणार आहे. केवळ भारतीयच नव्हे तर जागतिक मनोरंजन उद्योगाला नवी दिशा देण्याच्या दृष्टीने ही परिषद एक निर्णायक वळण ठरणार आहे. बौद्धिक संपदांच्या निर्मितीतून अगणित संपत्ती निर्माण करता येते व ती राष्ट्राच्या उत्कर्षाचा केंद्रबिंदू ठरू शकते हे या परिषदेमागील खरे सूत्र आहे.

**समारोपः**

भारताच्या हृदयात एक नवे स्पंदन घडत आहे. तंत्रज्ञान, सांस्कृतिक आदानप्रदान आणि नव्या उद्योग क्षमतांचा शोध हे या परिषदेचे खरे मर्म आहे. भारतीय इतिहास, कला आणि संस्कृती यांचा हा महाकुंभ नव्या दिशांनी विकसित होणार आहे आणि एआय तंत्रज्ञानामुळे मनोरंजन उद्योगात प्राप्त होणाऱ्या नव्या संधी आणि आव्हाने तसेच अडचणींचाही परामर्श या परिषदेमध्ये घेतला जाईल. व्यापार, उद्योग आणि रोजगाराच्या दृष्टीने या परिषदेला विशेष महत्त्व आहे. लक्षावधी भारतीय तरुणांच्या जीवनात नवी क्रांती घडविण्याचे सामर्थ्य या परिषदेच्या रुपाने प्रकट होणार आहे. भारतातील माध्यम आणि मनोरंजन शिक्षणाला सुद्धा ही एक नवी सुवर्णसंधी आहे असेच म्हणावे लागेल.

● प्रासंगिक

## साक्षर राज्यातलं भेदक वास्तव

केरळ हे राज्य एकीकडे देशातील साक्षरतेचा उच्च दर, प्रगत वैद्यकीय आणि सामाजिक पायाभूत सुविधा यासाठी ओळखले जाते; तर दुसरीकडे कामाच्या संधींसाठी प्रचंड प्रमाणावर होत असलेले परदेशी स्थलांतर हे या राज्याचे दुसरे वास्तव आहे. गेल्या काही दशकांत मध्यपूर्वेतील देशांमध्ये विशेषतः आखाती राष्ट्रांमध्ये केरळमधील तरुणांचे मोठ्या प्रमाणावर स्थलांतर झाले आहे. या परदेशगमनामुळे आर्थिकदृष्ट्या अनेक कुटुंबांची उन्नती झाली असली, तरीही त्याचे सामाजिक, मानसिक आणि सांस्कृतिक परिणाम केरळमधील गावांवर स्पष्टपणे जाणवतात.

**सामाजिक पोकळी**

गेल्या काही वर्षांत परदेशातून येणाऱ्या 'रेमिटन्स'मुळे केरळमधील अनेक कुटुंबांना आर्थिक स्थैर्य मिळाले. गावागावात भव्य घरं, आधुनिक गाड्या आणि शहरी जीवनशैली दिसू लागली. पण ही उन्नती एकाकीपणाची सावली घेऊन आली. तरुण मुलं–मुली शिक्षण पूर्ण होताच परदेशात गेले आणि गावात राहिले केवळ वृद्ध आईवडील. अनेक घरांमध्ये वृद्ध पालकांना वृद्धाश्रमासारख्या परिस्थितीत जगावे लागत आहे. काही घरं तर वर्षानुवर्षं बंद पडलेली, पडझड झालेली दिसतात. तरुणांच्या स्थलांतरामुळे राज्यातील सुमारे २१ लाख घरांमध्ये फक्त वृद्ध लोकच उरले आहेत. स्थलांतरामुळे लाखो घरांमध्ये फक्त कुलूपे लटकलेली दिसतात.

**कौटुंबिक रचना बदलतेय**

केरळमधील पारंपरिक संयुक्त कुटुंबपद्धती हळूहळू विखुरली जात आहे. स्थलांतरित व्यक्ती आपल्या जोडीदारासह परदेशात स्थायिक होत असल्याने आईवडील मात्र मागे राहतात. वृद्धत्वात आवश्यक असलेला भावनिक आणि सामाजिक आधार हरवतो. काही वेळा वृद्ध व्यक्तींना मानसिक आजार, नैराश्य किंवा एकाकीपणामुळे उद्भवणाऱ्या समस्या जाणवतात. औपचारिक मदतीच्या सुविधा असूनही त्या प्रभावीपणे पोहोचत नाहीत.

सांस्कृतिक आणि सामाजिक घडामोडींना तडा

गावातील पारंपरिक सण, उत्सव, सामाजिक समारंभ हे सामूहिकतेवर आधारित असतात. पण जेव्हा गावातील कार्यक्षम, काम करणारी पिढी स्थलांतरित होते, तेव्हा या सांस्कृतिक उपक्रमांमध्ये उत्साह घटतो. ग्रामस्थांची संख्याच कमी झाल्यामुळे मंदिरांतील सेवा, शाळांचे विद्यार्थी, स्थानिक स्वयंसेवी संस्था या सगळ्यांच्या क्रियाशीलतेवर परिणाम होतो. ग्रामसमूहातील 'सामूहिक ओळख' क्षीण होत जाते.

**सामाजिक असमतोल आणि दुभंग**

परदेशातून पैसे पाठवणाऱ्या कुटुंबांनी मोठी आर्थिक प्रगती केली, मात्र गावात राहिलेल्या कुटुंबांना त्याचा लाभ झाला नाही. त्यामुळे एक आर्थिक–सामाजिक दुभंग तयार झाला आहे. 'परदेशी पैसा' हे एक नवे सामाजिक स्थानक बनले आहे. या आर्थिक विषमतेमुळे ग्रामीण भागात असंतोष, असुरक्षितता आणि आपलेपणाच्या भावना कमी होण्याचे प्रमाण वाढले आहे.

वृद्धांच्या गरजा आणि प्रशासनाची भूमिका

केरळमधील सरकारने मार्च महिन्याच्या अखेरीस, वृद्धांच्या एकाकीपणाच्या संकटाची जाणीव करून, ज्येष्ठ नागरिक आयोगाची स्थापना करण्याची घोषणा केली आहे. सरकारचा दावा आहे की हे आयोग एकाकीपणाने ग्रस्त असलेल्या वृद्धांच्या हक्कांसाठी, कल्याणासाठी आणि पुनर्वसनासाठी काम करेल. पण लालफितशाही आणि भ्रष्ट व्यवस्थेत हे आयोग कधी प्रभावी भूमिका बजावेल हे काळच सांगेल. यापूर्वीही तेथील सरकारने वृद्धांसाठी काही योजनांची अंमलबजावणी केली असली, तरी त्या फारशा प्रभावी ठरत नाहीत. एकट्या वृद्ध व्यक्तींना मानसिक आधार, वैद्यकीय सुविधा आणि सामाजिक संवाद यांची गरज असते. काही ठिकाणी 'वृद्ध मैत्री संघ', 'सामूहिक जेवण योजना' आदींचा प्रयोग करण्यात आला आहे, पण यासाठी मोठ्या प्रमाणावर सरकारी–खाजगी सहभाग आवश्यक आहे.

आजचा तरुण शिक्षण घेऊन परदेशात जातो, तेथील चांगल्या पगाराच्या नोकरीमुळे त्याचे व्यक्तिगत जीवन समृद्ध होते. पण हा आनंद गावासाठी 'शोकगीत' ठरतोय. म्हणूनच, केरळसारख्या राज्याने आता धोरणात्मक पातळीवर गावांचा विकास, स्थानिक रोजगारनिर्मिती, वृद्धांसाठी सेवा–व्यवस्था यांवर लक्ष केंद्रित करणे अत्यावश्यक आहे. तरुणांना परदेशगमनाची संधी अबाधित ठेवतानाच त्यांचे गावाशी नातं टिकवण्यासाठी 'गावाशी संबंध राखणारी नवी धोरणं' उभी करावी लागतील.

केरळमधील स्थलांतर ही केवळ आर्थिक किंवा रोजगाराची गोष्ट राहिलेली नाही. ती आता सामाजिक आराखड्यात एक मोठा बदल घडवणारी प्रक्रिया ठरली आहे. म्हणूनच या प्रक्रियेचा सखोल अभ्यास करून, गावांची सामाजिक संरचना, वृद्धांची काळजी आणि सांस्कृतिक ओळख यांचे जतन करण्यासाठी नियोजनबद्ध प्रयत्नांची गरज आहे.

शिक्षणाने प्रगतीशील विचारसरणी दिली आहे, पण त्याचबरोबर अनंत भौतिक इच्छा देखील जागृत केल्या आहेत. अलिकडच्या काळात पंजाब–हरियाणामध्येही ही स्पर्धा दिसून येते. खरं तर, आपल्या धोरणकर्त्यांच्या अपयशाचाच हा परिणाम आहे, ज्यामुळे आपण देशातील तरुणांना त्यांच्या क्षमता आणि आकांक्षेनुसार रोजगार देऊ शकलो नाही. यामुळेच त्यांना ना त्यांच्या जन्मभूमीबद्दलचे प्रेम बाहेर जाण्यापासून रोखू शकते; ना आपल्या जाण्यामुळे वृद्ध पालकांचे काय होईल याची चिंता थांबवू शकते. २०५० पर्यंत भारतात साठ वर्षांपेक्षा जास्त वयाचे ३४.७ कोटी वृद्ध असतील. आजच्या तरुणाईला परदेशगमनाचे असलेले वेड पाहता केरळसारखीच स्थिती अन्य राज्यांमध्येही उद्भवू शकते. खुद्द सरकार आज फ्रान्स, जर्मनीसारख्या देशांना कुशल मनुष्यबळ पुरवण्यासाठी योजना आखत आहे. किंबहुना अनेकांच्या मते जगातील सर्वाधिक लोकसंख्य असणारा भारत जगाची मनुष्यबळ पुरवणी फॅक्टरी बनू शकतो. तसे झाल्यास आपल्या तरुणांचे भले होईलही; पण गावांचे आणि तिथल्या वृद्ध पालकांचे काय? आपण या आव्हानाला तोंड देण्यास तयार आहोत का?

– के. श्रीनिवासन

● जागतिक पत्रकार स्वातंत्र्य दिन

## लेखणीची मशाल विझू देऊ नका!

लोकशाहीची खरी शान म्हणजे मुक्त आणि निर्भय पत्रकारिता. समाजात काय चाललं आहे, जनतेला काय वाटतंय, सत्तेच्या निर्णायक केंद्रांमध्ये काय घडतंय याचा आरसा समाजासमोर धरण्याचं काम पत्रकार करतो. म्हणूनच ३ मे – जागतिक पत्रकार स्वातंत्र्य दिन, हा केवळ एक 'दिवस' नसून तो पत्रकारितेच्या मूल्यांचा, जबाबदाऱ्यांचा आणि तिच्या अस्तित्वाच्या लढ्याचा जागर आहे.

१९९१ मध्ये युनेस्कोच्या विंडहॉक परिषदेत हा दिवस साजरा करण्याची कल्पना पुढे आली. विंडहॉक (नामिबिया) येथे झालेल्या चर्चेत आफ्रिकन पत्रकारांनी स्वतंत्र व उत्तरदायी माध्यमांसाठी आवाज उठवला. या पार्श्वभूमीवर, १९९३ मध्ये संयुक्त राष्ट्र महासभेने ३ मे या दिवसाला अधिकृत मान्यता दिली.

त्यानंतर दरवर्षी ३ मे हा दिवस जगभरातील पत्रकारांना सन्मानित करण्यासाठी, त्यांच्या अडचणींविषयी जागरूकता वाढवण्यासाठी, आणि माध्यम स्वातंत्र्याचे संरक्षण करण्यासाठी साजरा केला जातो.

भारतीय संविधानात अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा मूलभूत अधिकार प्रत्येक नागरिकाला दिला आहे. पत्रकार हे या अधिकाराचे खरे धारक असतात. ते प्रश्न विचारतात, उत्तरं मागतात, आणि लोकांच्या मनात असलेला 'अबोल' आवाज बाहेर आणतात.

पत्रकारांनी अनेकदा आपल्या लेखणीच्या माध्यमातून इतिहास घडवलेला आहे. आणीबाणीत अनेक वृत्तपत्रांनी बंदी झुगारून सत्य लिहिलं, घोटाळे, गैरव्यवहार उघडकीस आणले.अनेक समाजहिताचे प्रश्न मुख्य प्रवाहात आणले. ही ताकद कोणत्याही बंदुकीपेक्षा मोठी आहे.

आजच्या डिजिटल युगात पत्रकारितेची गती वाढली आहे, पण धोकेही वाढले आहेत. काही ठिकाणी पत्रकारांना धमक्या दिल्या जातात, खोट्या गुन्ह्यांमध्ये अडकवले जाते, त्यांच्यावर हल्ले होतात.

रिपोर्टर्स विदाउट बॉर्डर्स (ठड्ऋ) या संस्थेच्या अहवालानुसार भारतात पत्रकारितेचं स्वातंत्र्य वर्षागणिक कमी होत आहे. विशेषतः जिल्हा आणि ग्रामीण भागातील पत्रकार फारच असुरक्षित परिस्थितीत काम करत आहेत.

राजधानीतील किंवा शहरातील माध्यमांच्या तुलनेत ग्रामीण भागातील पत्रकार अधिक कठीण परिस्थितीत कार्य करतात. बहुतांश वेळा स्वतःच्या साधनसंपत्तीवरच बातम्या तयार करतात. ना पुरेशा सुविधा, ना प्रशिक्षण, ना संरक्षण.

त्यांचं कार्य ही लोकशाहीची खरी नाळ आहे कारण ते थेट जमिनीवरचे प्रश्न समोर आणतात. अशा पत्रकारांना प्रोत्साहन देणं, संघटनांमार्फत आधार देणं, आणि त्यांच्या सुरक्षेचा मुद्दा राष्ट्रीय पातळीवर मांडणं हे आपलं कर्तव्य आहे.

३ मे आपल्याला हे सांगतो की

पत्रकारिता म्हणजे केवळ बातम्यांचा धंदा नाही, ती लोकशाहीची चेतना आहे.

पत्रकाराला घाबरवलं, दबाव आणला, तर तो केवळ एक व्यक्ती नाही, तर संपूर्ण समाजाचा आवाज दाबला जातो.

विरोधी मत, प्रश्न विचारण्याचं स्वातंत्र्य टिकवणं हे सशक्त राष्ट्राचं लक्षण असतं.

आपण सगळे मिळून हा निर्धार करूया की मुक्त पत्रकारितेवरचा कोणताही आघात सहन केला जाणार नाही.

आजचा दिवस हेही आठवण करून देतो की, मायक्रोफोन दाबून आवाज बंद करता येतो, पण सत्याचा आवाज दाबता येत नाही.

जिंदाबाद जिंदाबाद

'व्हॉईस ऑफ मीडिया' जिंदाबाद

**संदीप काळे**
**(संस्थापक अध्यक्ष 'व्हॉईस ऑफ मीडिया')**

पान १ वरुन

**माजीमंत्री बाळासाहेब थोरात काँग्रेसच्या कोट्यातून राज्यसभेवर?**

'कारखान्याचं कसं?' या प्रश्नावर 'साहेब म्हणतील तसं!' हेच उत्तर कानावर पडत आहे.

गाव पुढाऱ्यांचा अतिआत्मविश्वास, गावागावात निर्माण झालेले गट आणि प्रत्यक्ष जमीनस्तरापासून तुटलेली नाळ या त्रिसुत्रीने यंदाच्या विधानसभा निवडणुकीत राज्याच्या राजकारणातील भारदस्त व्यक्तित्व म्हणून ओळख असलेल्या माजीमंत्री बाळासाहेब थोरात यांना पराभव पत्करावा लागला. त्यानंतरच्या सहा महिन्यांतच सहकार महर्षी भाऊसाहेब थोरात साखर कारखान्याची निवडणूक जाहीर झाल्याने यशाने आत्मविश्वास दुणावलेल्या महायुतीकडून या निवडणुकीतही 'पॅनेल' उभे राहील असे वातावरण निर्माण झाले. आमदार अमोल खताळ यांनी 'महायुती पूर्ण ताकदीने कारखाना लढवणार' अशी घोषणाही केली. मात्र दरम्यानच्या काळात घडलेल्या नाट्यमय राजकीय घडामोडींनी उमेदवारी दाखल करण्याच्या अगदी शेवटच्या क्षणी 'सहकारात राजकारण नको!' असे सांगत महायुतीने निवडणुकीतून पूर्णतः माघार घेतली.

विधासभेतील पराभवाची समीक्षा करताना त्यावेळच्या संचालक मंडळाने अपेक्षित काम केले नाही. परिणाम कारखान्याच्या संचालकांच्या गावातूनच पीछाडी मिळाल्याची अनेक उदाहरणे समोर आल्यानंतर माजीमंत्री थोरात यांनी कारखाना निवडणुकीत भाकरी फिरवण्याचा निर्णय घेत अपवाद वगळता बहुतेक संचालकांना नारळ दिला. त्यामुळे विद्यमान संचालक मंडळात नव्या चेहऱ्यांचाच अधिक भरणा असल्याचेही दिसून आले. या निर्णयाने जुन्या पुढाऱ्यांसह काही संचालकांमध्ये नाराजीही निर्माण झाली. मात्र खुद्द साहेबच चेअरमन होणार असल्याचे चित्र समोर दिसत असल्याने अशांनी आवंढा गिळून गप्प राहण्यातच समाधान मानले. त्यामुळे बिनविरोध नंतर चेअरमनपदावर थोरातच असतील असे वाटत असतानाच आता काँग्रेसच्या कोट्यातून त्यांची राज्यसभेसाठी निवड होणार असल्याच्या चर्चा सुरु झाल्याने नवा संभ्रम निर्माण झाला आहे.

यासर्व घडामोडी कारखाना सभासदांची उत्सुकता वाढवणाऱ्या ठरत असून बाळासाहेब थोरात राज्यसभेवर गेल्यास कारखान्याची खुर्ची कोणाच्या वाट्याला यावरुन नव्या चर्चांना धुमारे फुटले आहेत. त्यातून थोरातांचे बंधु इंद्रजीत यांच्या नावाचीही चर्चा आहे. मात्र विधानसभेतील पराभवात त्यांच्या भूमिकेवरुनही शिमगा झाल्याने मोठ्या वर्गाकडून त्यांच्या नावाला विरोधही असल्याचे दिसून येत आहे. त्यातच यावेळी अपवाद वगळता बहुतेक संचालक कोरी पाटी असल्याने कारखान्याची जबाबदारी देताना भरवशासह अनुभवालाही जोखावे लागणार आहे. अशास्थितीत सहकारमहर्षींचे विश्वासू अशी ओळख असलेल्या आणि विद्यमान आमदार अमोल खताळ यांच्या धांदरफळ गटातील पांडूरंग घुले या एकमेव ज्येष्ठ संचालकाचे नाव आघाडीवर आले आहे.

पांडूरंग घुले म्हणजे अशोक मोरे यांच्यासमवेत उदयाला आलेले नाव असून अशोकरावांच्या निधनानंतर धांदरफळचा गढ राखण्यात त्यांची मुख्य भूमिका राहीली आहे. सद्यस्थितीत थोरातांना अपेक्षित असलेला सर्वसमावेशक, ग्रामीण भागाशी नाळ आणि दांडगा जनसंपर्क असलेल्या घुले यांच्याशिवाय सक्षम पर्याय नसल्याचेही बोलले जात आहे. मात्र थोरातांची राज्यसभा ते पांडूरंग घुलेंची चेअरमनपदावर वर्णी यासर्व गोष्टी केवळ चर्चेतल्या असून त्यावर कोणत्याही माध्यमातून अद्याप शिक्कामोर्तब झालेले नाही. सद्यस्थितीत चर्चेत असलेल्या कर्नाटकात काँग्रेसकडे तीन राज्यसभा असून त्यातील केवळ मल्लिकार्जुन खरगे यांची एकमेव जागा पुढील वर्षी जूनमध्ये रिक्त होणार आहे. त्यामुळे थोरातांचा राज्यसभेचा मार्ग कोणत्या राज्यातून जाणार यावरुनही उत्सुकता आणि संभ्रम कायम आहे. येत्या पंधरवड्यात त्यावरील पडदा हटण्याचीही शक्यता आहे. मात्र सध्या संगमनेर मतदारसंघात 'थोरातांची राज्यसभा' आणि 'कारखान्याचे चेअरमनपद' चांगलेच ट्रेंड असल्याचे दिसून येत आहे.

**तेरा वर्षीय चिमुकलीचा काविळीने मृत्यू!**

पाणीपुरवठा नसणे आणि आरोग्य विषयक दुर्लक्ष यामुळेच अशा प्रकारच्या घटना घडत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

पुढे बोलताना त्यांनी सांगितले की, अशा प्रकारची घटना पुन्हा होऊ नये म्हणून प्रशासनाने तात्काळ उपाययोजना करणे आवश्यक आहे. यासोबतच मृत तरुणीच्या कुटुंबाला शासनामार्फत भरीव आर्थिक मदत मिळावी, अशीही मागणी त्यांनी केली.

माजी आमदार पिचड यांनी राजुर येथील ग्रामीण रुग्णालयात जाऊन रुग्णांची विचारपूस केली. त्यांनी डॉ. रामनाथ दिघे यांना रुग्णांची अधिक काळजी घेण्याच्या सूचना दिल्या.या घटनेनंतर गावात हळहळ व्यक्त केली जात असून, स्थानिक नागरिकांमध्ये संतापाचे वातावरण पसरले आहे. या वेळी गणपत देशमुख, उपसरपंच

संतोष बनसोडे, शेखर वालझाडे, निलेश साकुरे, अतुल पवार, राम बांगर, अविनाश बनसोडे, सचिन देशमुख, अण्णा पाबळकर, दौलत देशमुख यांच्यासह अनेक ग्रामस्थ, पदाधिकारी व सामाजिक कार्यकर्ते उपस्थित होते.

स्वच्छ पाण्याचा अभाव व स्थानिक प्रशासनाचे दुर्लक्ष यामुळे कावीळसारखा गंभीर आजार उद्भवतो, हे याप्रकरणातून अधोरेखित होते. प्रशासनाने तत्काळ सुधारणा न केल्यास अशी परिस्थिती अन्य ठिकाणीही उद्भवू शकते अशी शंका आता व्यक्त होऊ लागली आहे.

गेल्या १५ दिवसापासून राजूर मध्ये कावीळ रोगाचे थैमान सुरू आहे. दिवसेंदिवस याचा प्रादुर्भाव वाढतो आहे. ३ महिन्या पूर्वीच तत्कालीन बडतर्फ ग्रामविकास अधिकारी वर्पे यांना मिटिंग मध्ये ठराव करून पाण्याच्या टाकीची साफ सफाई करण्यास सांगितलं होते. मात्र त्या नंतरही कोणतीच कारवाई संबंधित ग्रामविकास अधिकाऱ्याकडून झाली नाही, त्याच प्रमाणे आरोग्य केंद्रातील कर्मचाऱ्यांनी कधीही पाण्याच्या टेस्ट केल्या नाहीत.त्यामुळे ही परिस्थिती ओढवली आहे, आणि त्या मुळे मी सुद्धा माझी नैतिक जबाबदारी समजून माझ्या उपसरपंच पदाचा राजीनामा देत असल्याचे उपसरपंच संतोष बनसोडे यांनी सांगितले.

**सततच्या त्रासाला कंटाळून विवाहितेची आत्महत्या!**

मामे सासरा जालिंदर सयाजी करांडे, मामे सासू रोहिणी जालिंदर करांडे (सर्व रा. देहरे, ता. नगर) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.मृत पूनम हिस बंगल्याच्या कामासाठी माहेराहून ३ लाख रुपये आणावेत या कारणासाठी तिला उपाशी पोटी ठेवून तिचा छळ करण्यात आला.

# डॉ.अनिरुद्ध वनकर यांच्या वादळवारा गीतांनी संगमनेरकर भारावले!

**नायक वृत्तसेवा, संगमनेर**




> ■ महाराष्ट्राला छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज, विविध संत व समाजसुधारकांचा वारसा आहे. समता व मानवतेचा मंत्र या सर्वांनी दिला आहे मात्र सध्या जाती भेदाचे होणारे राजकारण अत्यंत दुर्दैवी असून सर्व तरुणांनी एकत्र येऊन छत्रपती शिवाजी महाराजांच्या महाराष्ट्र धर्म व मानवता धर्म वाढवण्यासाठी काम करावे असे आवाहन डॉ.जयश्री थोरात यांनी केले.

देशात दुर्दैवाने जातीभेदाचा वनवा पेटला आहे. आपल्या गीतांमधून हा वनवा विझवण्याचे काम समतेचा पुरोगामी विचार घेऊन डॉ. अनिरुद्ध वनकर करत असल्याचे लोकनेते बाळासाहेब थोरात यांनी म्हटले असून हजारो संगमनेरकरांच्या उपस्थितीत शिव,शाहू,फुले, आंबेडकरांच्या विचारांवर विविध गीतांमधून समतेचा आणि मानवतेचा मंत्र देत डॉ. अनिरुद्ध वनकर यांनी संगमनेरकरांना मंत्रमुग्ध केले. अत्यंत संस्मरणीय झालेला हा कार्यक्रम संगमनेरकरांसाठी अभूतपूर्व ठरला.

संगमनेर काँग्रेस, छत्रपती प्रतिष्ठान, व बहुजन विचार मंच यांच्या वतीने महाराष्ट्र दिनाच्या निमित्ताने यशोधन मैदानावर संयुक्त जयंती सोहळ्यात डॉ.अनिरुद्ध वनकर यांचा लाईव्ह कॉन्सर्ट झाला. यावेळी माजी मंत्री लोकनेते बाळासाहेब थोरात, माजी आ.डॉ.सुधीर तांबे, दुर्गा तांबे, आयोजक डॉ. जयश्री थोरात, संपतराव डोंगरे, विश्वास मुर्तडक, सोमेश्वर दिवटे, डॉ.हसमुख जैन, शरयू देशमुख,सुधाकर जोशी, छत्रपती प्रतिष्ठानचे सचिन आहेर,प्रशांत गायकवाड यांच्यासह युवक काँग्रेस व छत्रपती प्रतिष्ठानचे युवक कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा ज्योतिबा फुले, भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर, यांना अभिवादन करून या कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. सुरुवातीलाच डॉ. अनिरुद्ध वनकर यांनी शिवरायांच्या छायेखाली नव्हती कशाची वान, आनंदाने नांदत होते हिंदू मुसलमान हे एकतेचे गीत गायले. यावेळी उपस्थित सर्वांच्या अंगावर शहारे आले. त्या पाठोपाठ जातीयवादावर आणि कायदे व्यवस्थेवर आसूड ओढत ईव्हीएम घोटाळ्या करणाऱ्या सरकारवर कडाडून प्रहार केला.

संविधान लिहून भीमा तू जगण्याचे बळ दिले, काळोखातून ज्योत पेटवून रान मोकळे केले हे गीत गायले. मतलबासाठी काही धार्मिक शक्ती राजकारणी लोक महात्मा गांधी आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव घेत असल्याची टीका त्यांनी केली. यावेळी अंधश्रद्धेवर प्रहार करताना खतरे मे खतरा बिठाया तीर्थ बनाया पानी, दुनिया भाई दिवानी, पैसो की धूळदानी ही कबीरवानी गायली. यावेळी उपस्थित सर्वांनी उभे राहून या गाण्याला दाद दिली.

यानंतर मन शुद्ध आहे, तनबुद्ध आहे हे गीत गायले तर बदलापूर येथे चिमुकलीवर झाल्याच्या अत्याचाराच्या वेळी मला चीड नाही येत, यात माझा काय गुन्हा, दोष देऊ कुणा, दोष देऊ कुणा हे गीत गायल्यानंतर उपस्थितांच्या डोळ्यात पाणी आले. महाराष्ट्र दिनाच्या निमित्ताने माझी मैना गावावर राहिली ही फक्कड गायल्यानंतर टाळ्यांचा गजर झाला. तर मी वादळ वारा या गीताने अभूतपूर्व जल्लोष झाला. एकापाठोपाठ एक अत्यंत दर्जेदार झालेल्या सादरीकरणामुळे संपूर्ण माहोल समतेच्या गीतांमध्ये डुंबून गेला.

यावेळी माजी मंत्री बाळासाहेब थोरात म्हणाले, जातीभेदाच्या नावावर होणारे राजकारण हे अत्यंत दुर्दैवी आहे. सध्या देशांमध्ये जातीयतेचा वनवा पेटला आहे. हा वनवा विझविण्याचे काम पुरोगामी विचार घेऊन डॉ.अनिरुद्ध वनकर करत आहेत. राज्यपाल नियुक्त कलाकारांच्या कोट्यातून आमदार म्हणून त्यांची नियुक्ती काँग्रेस पक्षाने केली होती परंतु तत्कालीन राज्यपालांच्या हस्तक्षेपामुळे या कलाकाराची ही संधी हुकली मात्र जनतेच्या हृदयात त्यांचे मोठे स्थान आहे. हा देश व लोकशाही वाचवण्यासाठी हा पुरोगामी विचार वाढवण्यासाठी सर्वांनी एकत्र येऊन काम करावे असे आवाहन त्यांनी केले. माजी आ. डॉ.तांबे म्हणाले की, अंधश्रद्धा, रूढी, परंपरा, जातीयवाद अशा अनिष्ट चालीरीतींवर डॉ. अनिरुद्ध वनकर यांच्या गीतांमधून प्रबोधन होत आहे. खरे तर या विचारांची आता महाराष्ट्राला मोठी गरज असून सर्वांनी मानवतेचा धर्म वाढवावा.

प्रत्येक गाण्याला मिळणारी टाळ्यांची दाद, उत्कृष्ट संगीत, लाईट डेकोरेशन, भव्य दिव्य स्टेज, बैठक व्यवस्था, आणि प्रेक्षकांची उपस्थिती तसेच अभिनेत्री कोमल धांडे, नेहा गाडे, ईश्वर खोब्रागडे ,अभिजीत बद्दलवार आणि कलाकारांची साथ यामुळे हा वादळ वारा विचारांचा कार्यक्रम संस्मरणीय आणि अभूतपूर्व ठरला. या कार्यक्रमाचे स्वागत डॉ.जयश्री थोरात यांनी केले. याप्रसंगी संगमनेर मधील हजारो नागरिक,महिला व युवकांची मोठी उपस्थिती होती.

नायक ANCHOR

# यशस्वी व्हायचे असेल तर स्पर्धा परीक्षांशिवाय पर्याय नाही : तुंबारे

**नायक वृत्तसेवा, झरेकाठी**




जिल्हा परिषदेच्या डुक्रेवस्ती सारख्या छोट्याशा शाळेतील विद्यार्थ्यांनी आपले परिश्रम व शिक्षकांच्या मार्गदर्शनाच्या बळावर राज्य व जिल्हा पातळीवर आपल्या ज्ञानाचा झेंडा फडकावला आहे. या गुणवंत विद्यार्थ्यांनी राज्य व जिल्हा पातळीवर उत्कृष्ट कामगिरी करीत आपल्या शाळेचा व गावाचा नावलौकिक वाढवला आहे. जीवनात यशस्वी व्हायचे असेल तर स्पर्धा परीक्षांशिवाय पर्याय नाही. मातापालकांनी याबाबत जागृत राहून आपल्या मुलांना नीतीमूल्ये व संस्काराचेही धडे द्यावेत, असे प्रतिपादन राहुरीचे गटशिक्षणाधिकारी मोहिनीराज तुंबारे यांनी केले. गुणवंत विद्यार्थ्यांचा शाळा व पालकांच्यावतीने झालेल्या गौरव समारंभात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी सामाजिक कार्यकर्ते आबासाहेब डुक्रे होते. यावेळी राजेंद्र शिंदे, प्रभाकर शिंदे, बाबाजी मुंढे आदी शिक्षकांसह सुनिल चोथे, योगेश जेजुरकर, रमेश डुक्रे,अशोक धट, नवनाथ मोरे, सतिष पलघडमल, बंडू पवार, अश्विनी पलघडमल, कविता चोथे, रिमा नागरे, प्रतिभा पन्हाळे, प्रियंका अभंगे,शितल डुक्रे, प्रियंका जेजुरकर,अलका चोथे आदी पालक उपस्थित होते. डुक्रेवस्ती येथे नुकताच राज्यस्तरीय लक्ष्यवेध व मंथन सामान्यज्ञान परीक्षेतील यशस्वी विद्यार्थ्यांचा गुणगौरव सोहळा पालकांच्या पुढाकाराने मोठ्या उत्साहात पार पडला. यावेळी राहुरीचे गटशिक्षणाधिकारी मोहिनीराज तुंबारे व सात्रळ ग्रामपंचायतचे सरपंच सतिष ताठे यांच्या उपस्थितीत गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला. दिघेवस्ती शाळेचे आदर्श शिक्षक राजेंद्र बोकंद यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणातून विविध स्पर्धा परीक्षांची ओळख व विद्यार्थ्यांच्या दृष्टीकोनातून त्याचे महत्त्व विशद केले. गुणवंत विद्यार्थ्यांनी आपल्या मनोगतातून जिद्दीने निरंतर अभ्यास करीत अधिकारी बनण्याचा निर्धार व्यक्त केला.

तन्वी गणेश शिंदे (पहिली) हिने लक्ष्यवेध परीक्षेत राज्यात चौथा तर मंथन परीक्षेत राज्यात दहावा तर जिल्ह्यात पाचवा क्रमांक पटकावला. आराध्या योगेश पन्हाळे (दुसरी) हिने लक्ष्यवेध परीक्षेत राज्यात सहावा तर जिल्ह्यात प्रथम क्रमांक तसेच मंथन परीक्षेतही जिल्ह्यात आठवा तर केंद्रात पहिला क्रमांक पटकावला. रिद्धी गोपीनाथ डुक्रे हिने जिल्ह्यात बारावा तर मंथन परीक्षेत जिल्ह्यात तेरावा तर केंद्रात तिसरा क्रमांक मिळवला. लक्ष्यवेध परीक्षेत सम्राट नितीन अभंगे (दुसरी) याने जिल्ह्यात सोळावा तर आदित्य दौलत नागरे याने जिल्ह्यात १९ वा क्रमांक पटकावला. या यशस्वी विद्यार्थ्यांना वर्गशिक्षिका सुनिता उगले यांचे मार्गदर्शन लाभले. तसेच मिशन आरंभ शिष्यवृत्ती सराव परीक्षेत आवृत्ती प्रशांत शिंदे (चौथी) हिने ३०० पैकी २३२ तर आयुष दिपक चोथे याने २२४ गुण मिळवले. त्यांचाही सन्मान यावेळी करण्यात आला. त्यांना मुख्याध्यापक अनिल घोलप यांचे मार्गदर्शन लाभले.यावेळी पालक योगेश पन्हाळे यांनी शाळेसाठी सिलींग फॅन व स्नेहभोजन दिले. गणेश शिंदे यांनी शाळेला तीन खुर्च्या भेट दिल्या. तसेच विद्यार्थी भेटवस्तू व सत्कार नियोजन दौलत नागरे व गोपीनाथ डुक्रे यांनी केले.

प्रास्ताविक अनिल घोलप यांनी तर सूत्रसंचालन सुनिता उगले यांनी केले. यशस्वी विद्यार्थी व शिक्षकांचे संतोष डुक्रे, सर्जेराव शिंदे, ज्ञानदेव डुक्रे, संदिप शिंदे, मनिषा डुक्रे, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष रमेश शिंदे, कोल्हार बीट विस्तार अधिकारी इंदूमती धट, सोनगाव केंद्रप्रमुख सरस्वती खराडे आदींनी अभिनंदन केले आहे.

# अकोलेत तरुणाची आत्महत्या!

**नायक वृत्तसेवा, अकोले**



पत्नीच्या सातत्याच्या जाचाला कंटाळून तरुणाने गायांच्या गोठ्यातील लाकडाला दोरीने गळफास घेऊन आपले जीवन संपविल्याची घटना शहरातील माळीझाप शिवारात घडली. संदीप दिलीप मंडलिक असे या घटनेत आत्महत्या केलेल्या तरुणाचे नाव आहे.

या प्रकरणी अकोले पोलिसांत मयत संदीप याचे वडील दिलीप उमाजी मंडलिक यांनी मयत संदीप याची पत्नी रूपाली हिच्या विरुद्ध तक्रार दाखल केली आहे.दुपारी एक वाजण्याच्या सुमारास संदीप याची बहीण उज्वला हिच्या ही बाब लक्षात आल्यावर तिने आरडाओरडा केला.त्यानंतर अकोले पोलिसांना कळविल्यानंतर पोलिस घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी संदीपचा मृतदेह खाली काढला, तेव्हा त्याच्या खिशात एक चिठ्ठी मिळून आली. त्यामध्ये एवढे सर्व होऊन ही बायको सुधारली नाही, त्यामुळे जीवन संपवत आहे. बैठक घेऊन काही उपयोग नाही, कारण मला तिला सोडायचं नव्हत ती सुधारावी ही अपेक्षा असा मजकूर लिहिलेला होता.

यानंतर संदीप याचे वडील दिलीप उमाजी मंडलिक यांनी संदीप याची पत्नी रुपाली हिच्या विरुद्ध तक्रार दिली असून संदीप याच्या मृत्यूस रूपाली ही कारणीभूत असल्याचा आरोप या तक्रारीत करण्यात आला आहे. याबाबत अधिक तपास अकोले पोलिस करीत आहे. मयत संदीप हा बुवासाहेब नवले पतसंस्थेच्या राजूर शाखेत लिपिक म्हणून सेवेत होता. त्याच्या निधनाने सर्वत्र हळहळ व्यक्त करण्यात येत असून त्याच्या मागे एक मुलगा,वडील, आई असा परिवार आहे.


**गव्यम पशु आहार**

या उत्कृष्ट पशुखाद्य विक्रीसाठी

**सेल्स प्रमोटर - ५ जागा**

( आकर्षक पगार व सुविधा )

**पाहिजेत**

- महाराष्ट्रातील रिजन मध्ये व संगमनेर तालुक्यातील दूध संकलन केंद्रामध्ये फिरण्याची तयारी आवश्यक.
- टु-व्हिलर व फोर-व्हिलर येणे आवश्यक.
- टॅब चालविण्याचे ज्ञान आवश्यक.

संपर्क

गव्यम आयुर्वेदिक पशु आहार

हल्दी, तुलसी, शतावरी, धान्य व तेलबिया, हायप्रोटीन खाद्य युक्त

ऑफीस - C/o. पडतानी इंडस्ट्रीज, जोशी हॉटेल मागे, संगमनेर

9142003939



**पाहिजेत 9850545333**

एम. जी. काजळे ज्वेलर्ससाठी तात्काळ पाहिजेत

सेल्समन - 4 जागा (स्त्री/पुरुष)

कॉम्प्युअर ऑपरेटर - 2 जागा

पगार - 15000 ते 20000व इतर सवलती

पत्ता- एम. जी. काजळे ज्वेलर्स, जाणता राजा रोड, संगमनेर



SR THORAT DAIRY **पाहिजेत** GAGANGIRI PACKAGED PURITY

| अ.क्र | पदाचे नाव | जागा | शैक्षणीक पात्रता / अनुभव |
|---|---|---|---|
| १. | सेक्युरिटी गार्ड | ५ | अनुभव किमान ५ वर्षे. (Ex-Servicemen preferred) |
| २. | ईटीपी ऑपरेटर | २ | शिक्षण १२वी व पदवीधर अनुभव किमान ४ वर्ष, पुरुष, वय मर्यादा ३० वर्ष |
| ३. | बॉयलर फायरमन | २ | शिक्षण १२वी अनुभव किमान २ वर्ष, पुरुष, वय मर्यादा ३० वर्ष |
| ४. | 1st क्लास बॉयलर ऑपरेटर | २ | अनुभव किमान ५ वर्षे, पुरुष, वय मर्यादा ३० वर्ष |
| ५. | कामगार (पुरुष) | १० | शिक्षण १२वी वय मर्यादा ३० वर्ष |

समक्ष भेटणे – एच.आर. विभागास मुळ कागदपत्रासह रविवार सोडून.

ऑफिस – एस.आर. थोरात मिल्क प्रोडक्टस प्रा.लि. राजापूर रोड संगमनेर

मोबा. 9860100936/937

E-Mail Id: admin@srthoratmilk.com / hr@srthoratmilk.com



MALPANI

प्रोसेस विभागात

**कामगार भरती**

चालू आहे!

वयोगट १८ ते ३५ वर्षापर्यंत, शिक्षणाची अट नाही,

पुरुष कामगारांसाठी होस्टेलची सुविधा, कंपनी युनिफॉर्म,

नियमानुसार पी.एफ., बोनस, ई.एस.आय.सी. (शासकीय वैद्यकीय विमा)

पाल्यांसाठी मोफत पाठ्यपुस्तक योजना, सवलतीच्या दरात कॅन्टीन व

ग्राहक भांडारची सोय, या सारख्या अनेक सोई–सुविधा व सवलती

सर्व लाभांसह एकत्रीत दर (८ तासांसाठी) दैनिक वेतन रु. ५४०/–

अधिक माहितीसाठी संपर्क

मे. दामोदर जगन्नाथ मालपाणी

मालपाणी इस्टेट, अकोले रोड, ता. संगमनेर, जि. अहमदनगर

मो. ८९५६९५६६१२

मो. ९८२२६०१६५२

मो. ९५५२८८१३००


'बांधिलकी जनहिताची नायक' हे दैनिक मालक, मुद्रक व प्रकाशक घनश्याम हनुमानप्रसाद तिवाडी यांनी विकास प्रिंटींग ॲण्ड कॅरिअर्स प्रा.लि., प्लॉट नं. ३२, एम.आय.डी.सी. सातपूर, नाशिक येथे छापून ऐश्वर्या कॉम्प्लेक्स, तळमजला, गाळा क्रमांक बी–१०, बस स्टँडजवळ, संगमनेर, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर – ४२२ ६०५ येथे प्रसिद्ध केले. संपादक : गोरक्षनाथ भिमाजी मदने, कार्यकारी संपादक : श्याम तिवारी.

## पाहिजेत

### धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल

| अ.नं | पद | जागा |
|---|---|---|
| १ | R.M.O | २ |
| २ | Bsc Nursing | २ |
| ३ | Driver Plus Receptionist | २ |
| ४ | Maintanance | २ |
| ५ | Data opretor (MJPJAY and cashless department) | २ |

पत्ता: ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर, जि. अ. नगर
मो. ७४९९१७६८६४, ९४२०८५४३०६
फोन:०२४२५-२२७५७५/२२७५७४



बांधिलकी जनहिताची
# नायक
MAHMAR/2018/75654 | SRP/135/2022-2024














# देश दुष्काळमुक्त होण्यासाठी पंतप्रधानांचा संकल्प : केंद्रीयमंत्री पाटील

**नायक वृत्तसेवा, शिर्डी**



पुढील चार वर्षांत देशातील कोणतेही गाव, शेत पाण्यापासून वंचित राहू नये व देश दुष्काळमुक्त व्हावा, असा प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचा संकल्प असून यासाठी केंद्र शासन कटिबद्ध आहे, असे प्रतिपादन केंद्रीय जलशक्ती मंत्री सी.आर.पाटील यांनी केले. शासन तर आपले काम करणारच आहे, मात्र एक जबाबदार नागरिक म्हणून प्रत्येकाने पाण्याचा काटकसरीने वापर केला पाहिजे, गावातील पाणी गावातच अडवून साठवावे, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.

राहाता तालुक्यातील अस्तगाव येथे महाराष्ट्र सिंचन सुधारणा कार्यक्रम टप्पा १ अंतर्गत गोदावरी उजवा तट कालव्यावरील मातीकाम, बांधकाम व अस्तरीकरण कामाचे भूमिपूजन केंद्रीय जलशक्ती मंत्री सी.आर.पाटील यांच्या हस्ते झाले. त्याप्रसंगी ते बोलत होते. यावेळी राज्याचे जलसंपदा मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, राज्यसभा सदस्य खासदार धनंजय महाडिक, आमदार आशुतोष काळे, जलसंपदा विभागाचे अपर मुख्य सचिव दिपक कपूर, माजी मंत्री तथा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे संचालक आण्णासाहेब म्हस्के पाटील, माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील आदी उपस्थित होते.

केंद्रीय जलशक्ती मंत्री पाटील म्हणाले की, संपूर्ण जगाच्या १८ टक्के लोकसंख्या आणि १८ टक्के पशुधन भारतात आहे. मात्र संपूर्ण जगाच्या केवळ चार टक्के पाणी भारतात आहे. त्यामुळे पाण्याचे योग्य नियोजन करण्याची नितांत गरज आहे.देशात दरवर्षी सुमारे ४ हजार बीसीएम पावसाचे पाणी मिळते, मात्र आपल्याला त्यापैकी केवळ १ हजार १२० बीसीएम पाण्याची गरज असते. आपण ७५० बीसीएम जलसंचय करतो आणि धरणांमध्ये २५० बीसीएम पाणी साठवतो. तरीही पाण्याची कमतरता आहे. एक धरण उभारण्यासाठी २५ वर्षे लागतात. मात्र तेवढा वेळ आपल्या हातात नाही, म्हणून पाण्याच्या बचतीची अत्यंत गरज आहे.

यासाठी प्रत्येक शेतकऱ्यांनी आपल्या गावात व शेतात चार बाय चारचा सहा फूट खोल खड्डा खोदून त्यात दगड-धोंडे टाकून नैसर्गिकरित्या जलसंचय करण्याची गरज आहे. अशा एका शोषखड्ड्याच्या माध्यमातून सुमारे पाच लाख लिटर पाणी जमिनीत मुरवता येते.

देशात तेरा लाख स्ट्रक्चर खड्यांच्या माध्यमातून पाणी संचय करण्याची चळवळ राबविण्यात आली. यातून लाखो लीटर पाण्याची बचत झाली, असेही त्यांनी सांगितले.

तुमच्या भागात जर एक हजार शेतकरी तयार झाल्यास केंद्राच्या एजन्सीमार्फत या भागात पाणी संचय करणारे शोषखड्डे खोदून देण्यात येतील. या शोषखड्ड्यांद्वारे पाणी संचय झाल्यास पुढील वर्षी शेतकऱ्यांनी स्वतः पुढाकार घेऊन ही चळवळ राबवावी, अशी अपेक्षा पाटील यांनी व्यक्त केली. नदी-नाल्यांतील पुराच्या पाण्यापासून कॅनमध्ये पाणी आणण्याची वेळ येऊ नये, यासाठी आजच आपण पाणी बचतीची चळवळ गांभीर्याने घेण्याची गरज आहे, असेही त्यांनी सांगितले.

■ राज्यशासन सुमारे एक लाख कोटींच्या खर्चातून चार नदीजोड प्रकल्पाच्या माध्यमातून गोदावरी खोऱ्यात ८३ टीएमसी पाणी आणणार असून यातून गोदावरी खोरे कायमचे दुष्काळमुक्त होणार असल्याचे जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी यावेळी सांगितले.

पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील म्हणाले, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांची संकल्पना असलेल्या नदीजोड प्रकल्पाच्या माध्यमातून संपूर्ण देश दुष्काळमुक्त करण्याचा संकल्प आहे. उपलब्ध पाण्यात शेतीला सिंचन झाले पाहिजे यासाठी जलसंपदा विभागाचा प्रयत्न आहे. नदीजोड प्रकल्प पूर्ण करण्याचे स्वप्न पद्मश्री बाळासाहेब विखे पाटील यांचे होते, ते स्वप्न माझ्या हातून होत आहे ही माझ्यासाठी भाग्याची गोष्ट आहे. गोदावरी उजवा व डावा अशा दोन्ही कालव्यांचे काम पूर्ण करण्यात येईल. आज भूमिपूजन करण्यात आलेल्या कालव्याचे डिसेंबर २०२६ पर्यंत काम पूर्ण करण्यात येईल.आमदार आशुतोष काळे, आण्णासाहेब म्हस्के पाटील यांचेही भाषण झाले. शासनाने मागील काही वर्षांत राज्यातील १८२ प्रकल्पांना सुधारित प्रशासकीय मान्यता दिली असून यातून २५ लाख ७८ हजार हेक्टर क्षेत्र ओलिताखाली आले, असे प्रास्ताविकात दिपक कपूर यांनी सांगितले.

# जातिनिहाय जनगणनेमुळे प्रत्येक घटकाला न्याय मिळणार : आ.खताळ

■ केंद्रातील नरेंद्र मोदी सरकारचा हा निर्णय केवळ राजकीय नाही, तर समाज परिवर्तनाच्या दिशेने एक ऐतिहासिक पाऊल आहे. सबका साथ, सबका विकास ही संकल्पना प्रत्यक्षात आणत आहे. हा निर्णय देशाच्या सामाजिक विकासाचा चेहरा बदलणारा ठरणार असल्याचे आ. अमोल खताळ यांनी सांगितले.

**नायक वृत्तसेवा, संगमनेर**



जातनिहाय जनगणना करण्याचा मुद्दा काँग्रेसच्या जाहीरनाम्यात असतानाही, त्यांचे सरकार सत्तेवर असताना त्यांनी त्या मुद्द्याकडे गेले ६५ वर्ष या महत्त्वाच्या मुद्याकडे दुर्लक्ष केले होते.त्यांच्या या दुर्लक्षामुळे देशातील विविध जातींमध्ये भांडणे आणि संघर्ष निर्माण झाले. मात्र केंद्रातील मोदी सरकारने जातीनिहाय जनगणना करण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला. त्या निर्णयामुळे समाजातील प्रत्येक घटकाला न्याय मिळणार असल्याचे मत आमदार अमोल खताळ यांनी व्यक्त केले.

केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीमध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जातिनिहाय जनगणना करण्याचा ऐतिहासिक

निर्णय घेतला, या निर्णयाबद्दल बोलताना आमदार खताळ म्हणाले की, काँग्रेसच्या वर्तुणुकीमुळे अनेक जातींमध्ये भेदभाव वाढला, आणि अनेक प्रश्न प्रलंबित राहिले मात्र आता केंद्रातील मोदी सरकारच्या नेतृत्वाखाली जातिनिहाय जनगणना होईल आणि त्याद्वारे आरक्षणासह अनेक मुद्द्यांना न्याय मिळेल.

तसेच सामाजिक परिस्थितीची नोंद होऊन जाती आणि लोकसंख्येची, शैक्षणिक पातळीची, आर्थिक स्थितीची आणि प्रशासनातील सहभागाची माहिती मिळवणे सोयीस्कर होईल. तसेच पारदर्शक योजना कागदोपत्री नोंदींमुळे विविध वर्गांच्या गरजांची अधिक अचूक माहिती मिळेल, ज्यामुळे राज्य आणि केंद्र सरकार अधिक प्रभावी योजना राबवू शकतील.

सामाजिक न्यायाची दिशा,संविधानाने दिलेले समान संधीचे अधिकार प्रत्यक्षात आणण्यासाठी ही जनगणना आधारस्तंभ ठरेल.राजकीय आणि सामाजिक प्रतिनिधित्व जातीनिहाय जनगणनेमुळे लोकांना संख्येनुसार योग्य प्रतिनिधित्व मिळविण्यासाठी बळ मिळेल, आणि विविध जातींच्या राजकीय आणि सामाजिक मागण्यांना आधार मिळेल.

















